**किरकोळ दिवाणी अर्ज नं. १५/२०२२**

**CNR No.MHSI01000172-2022**

## <u>निशाणी ४१ खालील आदेश</u>

अर्जदाराने सदरचा अर्ज हा सामनेवाला विरुध्द जैसे थे परिस्थिती ठेवण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जावर सामनेवाला नं. १अ ते १ड यांनी निशाणी ५१ वर म्हणणे दाखल करुन विरोध केलेला आहे. अर्जदाराच्या वकीलांना निशाणी ५९ वर लेखी युक्तिवाद दाखल केलेला आहे. सामनेवाला यांच्या वकीलांना निशाणी ६२ वर म्हणणे दाखल करुन विरोध केलेला आहे. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. अर्जदाराचे अर्जामध्ये थोडक्यात कथन की, अर्जदाराने नियमित दावां नं. ३७/१९९४ च्या निकालपत्र व निवाड्याविरुध्द अपिल करण्यासाठी झालेल्या विलंबनासाठी अर्ज केलेला आहे. सदर अर्ज हा त्यांच्या बाजूने होण्याची शाश्वती आहे. मूळ अर्ज चालण्यास बराच कालावधी लागणार आहे. मूळ अर्ज चालण्यास कालावधी लागत असल्यामुळे सामनेवाला हे दावा मिळकतीमध्ये पाया खुदाई करुन घराचे बांधकामास सुरुवात केलेली आहे. त्यामुळे ताकीद अर्ज चालण्यास कालावधी लागणार असल्याने सामनेवाला यांचे म्हणणे येई तोपर्यंत त्यांनी जैसे थे परिस्थिती ठेवण्याकरीता अर्ज दाखल केलेला आहे. तरी तो मंजूर करावा अशी मागणी केलेली आहे.

३. सामनेवाला नं. १ व २ यांनी निशाणी ५१ वर अर्जास म्हणणे दाखल करुन विरोध केलेला आहे. सामनेवाला यांनी अर्जदाराचा अर्जातील संपुर्ण मजकूर नाकरलेला आहे. यात सामनेवाला यांचे कथन की, सामनेवाला याने घर बांधण्यासाठी पाया खणण्याचे काम पुर्ण करुन पाया बांधणी केलेली आहे. सामनेवाला याने दावा मिळकतीच्या वाटपाप्रमाणेच स्वतंत्र कब्जे वहिवाटीनुसार घराच्या बांधकामाचे नियोजन केलेले आहे. सदर बांधकामाशी अर्जदार यांचा कोणताही संबंध नाही. सामनेवाला यांना त्रास देण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला असल्यामुळे अर्ज हा खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

४. सामनेवालाचे पुढे कथन की, मूळ दावा हा मंजूर झालेला असून दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप झालेले आहे. सदर निकालाविरुध्द अर्जदाराने नियमित दिवाणी अपिल नं. ५५/१९९९ दाखल केलेले होते. सदर अपिलाचा निकाल दि. २७/०३/२००३ रोजी होऊन अपिल नामंजूर केलेले आहे. त्यानंतर मूळ दाव्याच्या निकालाविरुध्द अर्जदार यांचा पुर्वाधिकारी यांचा हिस्सा ठरलेला आहे. मूळ दाव्याचा निकाल हा गुणदोषावर होऊन वादीच्या पुर्वजांना १/४ हिस्सा मंजूर झालेला आहे. सदर न्यायनिर्णयानुसार दावा मिळकतीचे प्रत्यक्ष तुटक व प्रथम कब्जा झालेला आहे. त्यामुळे पुन्हा त्याच कारणासाठी वाद उपस्थित करता येणार नाही. अर्जदार यांनी सामनेवाला विरुध्द तहसिलदार मालवण ते अप्पर मुख्यसचिव महसूल यांच्याकडे वाटप चुकीचे झाले असल्याबाबत आव्हानीत केले आहे. त्यामध्येही अर्जदाराचा अर्ज हा फेटाळण्यात आलेला आहे. सबब दावा मिळकतीचे वाटप पुर्ण झाले असल्यामुळे सदरचा मूळ अर्ज हा चालण्यास पात्र नाही. सबब, अर्जदाराचे अर्जामध्ये योग्य व संयुक्तिक कारण नाही. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज हा खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

५. अर्जदाराचा अर्ज, त्यावरील सामनेवालाचे म्हणणे उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता, त्याठिकाणी तुर्तातुर्त ताकीद अर्जाची सुनावणी होऊन आदेश पारीत केलेला आहे. त्यामुळे या अर्जाती जैसे थे स्थितीच्या अर्जाची मागणी ही ताकीद अर्जामध्ये समाविष्ट होत असल्यामुळे सदरचा अर्ज हा चालण्यास पात्र नाही. सबब, या व वरील कारणास्तव मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**<u>आदेश</u>**

अर्जदाराचा निशाणी ४१ वरील अर्ज खर्चासह नामंजूर करणेत येत आहे.

SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Digitally signed by SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Date: 2026.01.16 10:57:21 +0530

( श्री.एस.एस.इंदलकर)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
सिंधुदुर्ग–ओरोस.

सिंधुदुर्ग–ओरोस
दिनांक– १४/०१/२०२६